(इंग्रजी भाषेत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

[२०२४] ५ एससीआर ५२३ : २०२४ आयएनएससी ४०५

संत भगवान बाबा शिक्षण मंडळ व इतर

विरुद्ध

गुणवंत व इतर

(दिवाणी अपील क्र. २२२५/२०११)

०३ एप्रिल २०२४

[न्या. हिमा कोहली आणि न्या. अहसानुद्दीन अमानुल्लाह]

विचारार्थ मुद्दा

उत्तरवादी क्र. १ द्वारा दाखल करण्यात आलेली रिट याचिका मंजूर कण्यात आणि त्याला अपीलकर्ता क्र. ३-शाळेत शिक्षणसेवक पदावर नियुक्त करण्यात, उच्च न्यायालय, न्याय्य होते का ?

मुख्य नोंदी

सेवा कायदा – नियुक्ती – शिक्षण सेवक – उत्तरवादी क्र. १ ला अर्जदार क्र. ३-शाळेत शिपाई म्हणून नियुक्त करण्यात आले - उत्तरवादी क्र. १ च्या म्हणण्यानुसार, त्याने

शिक्षणसेवक पदासाठी आवश्यक अर्हता प्राप्त केली आणि या पदासाठी अनेक निवेदने सादर केली, परंतु त्यांची सकारात्मक दखल घेण्यात आली नव्हती - अपीलकर्ता क्र. १ ने शिक्षणसेवक पदावरील नियुक्तीसाठी अर्ज मागवित जाहिरात प्रसिद्ध केली - उत्तरवादी क्र. १ ने अर्ज दाखल केला नाही, त्याऐवजी अपीलकर्त्यांनी पद भरल्यानंतर, उत्तरवादी क्र. १ ने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली - रिट याचिका उत्तरवादी क्र. १ च्या बाजूने निर्णित करण्यात आली - अचूकता:

निर्णय दिला : एकदा उत्तरवादी क्र.१ ने उत्तरवादी क्र. ३-शाळेतील आपल्या सेवेदरम्यान आवश्यक अर्हता प्राप्त केल्यानंतर आणि महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ ज्यामध्ये समाविष्ट करण्यात आला होता, त्या संबंधित शासन निर्णयाने शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्याची आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याच्या अधीन राहून शिक्षण सेवक म्हणून, आणि पुढे, असे पद उपलब्ध असण्याच्या अधीन, नेमणूक करण्यास परवानगी दिली, तेव्हा, उत्तरवादी क्र. १ हा शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा एक भाग असल्याने, विषयांकित पदावरील नियुक्तीसाठी त्याला विचारात घेण्यास तो हक्कदार नाही, असे अपीलकर्त्यांनी नमूद करणे हे, ऐकून घेणे शक्य नाही - किंबहुना, दिनांक १०.०६.२००५ च्या विनियमामध्ये वापरण्यात आलेली भाषा ही स्वतःहून असे स्पष्ट करते की, शिक्षण सेवक पदावर नियुक्ती करवून घेण्यासाठी निवेदन देऊन कोणतीही पावले उचलण्याची कर्मचाऱ्याकरिता आवश्यक नव्हते आणि अपिलकर्त्यांवर असे दायित्व

टाकण्यात आले होते की, शिक्षण सेवक या पदावर कायमस्वरूपी रिक्त पदे (जागा) उपलब्ध असताना, अशा पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता ज्याने प्राप्त केली असती अशा शिक्षकेतर कर्मचारी वर्गाच्या सदस्याची थेट नियुक्ती करण्यात यावयाचे सुनिश्चित करणे – त्यामुळे, आक्षेपित न्यायनिर्णय हा योग्यरीत्या तर्कसंगत आहे आणि त्यात कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही. [परिच्छेद ११ व १२]

अधिनियमांची यादी

महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७.

महत्वाच्या शब्दांची यादी

सेवा कायदा; नियुक्ती; शिक्षण सेवक; आवश्यक अर्हता; शिक्षकेतर कर्मचारी; नियुक्तीसाठी हक्कदार; समन्याय यांचा समतोल साधणे; वरिष्ठता; निवृत्ती विषयक लाभ.

प्रकरणाचे उगमस्थान

दिवाणी अपिलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. २२२५/२०११.

रिट याचिका क्र. १८९५/२००७ मधील मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद येथील खंडपीठाचे दिनांक १७.११.२००९ चे न्यायनिर्णय व आदेशापासून.

पक्षकारांची उपस्थिती

आदर्शकुमार पांडे, शिवाजी एम. जाधव, विघ्नेश सिंह, एम. एस. अपूर्वा, ब्रिजकिशोर साह, प्रफुल्ल, आलोक कुमार , अपीलकर्त्यांचे वकील .

विवेक व्ही. सोळशे, वरुण व्ही. सोळशे, अंजनी कुमार झा, सचिन पाटील, सिद्धार्थ धर्माधिकारी, आदित्य अनिरुद्ध पांडे, भरत बागला, सौरव सिंग, जीओ जोसेफ, दुर्गेश गुप्ता, रिस्वी मोहम्मद, आदित्य कृष्णा, उत्तरवादींचे वकील .

सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय / आदेश

आदेश

१. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाद्वारे दिनांक १७ नोव्हेंबर २००९ रोजी पारित करण्यात आलेल्या न्यायनिर्णयामुळे अपीलकर्ते व्यथित झाले आहेत , ज्या न्यायनिर्णयाअन्वये, अपीलकर्ता क्र. ३-शाळेत शिक्षणसेवक पदावर नियुक्ती करण्यात यावयाची, इतर बाबींसोबत, प्रार्थना करीत, उत्तरवादी क्र. १ द्वारे दाखल करण्यात आलेली रिट याचिका[1] मान्य करण्यात आली, आणि त्यांस, विषयांकित पदावर दिनांक ३१ डिसेंबर २००९ रोजी किंवा त्यापूर्वी, कायद्याच्या अनुषंगाने, नियुक्त करण्यात येणे ही बाब सुनिश्चित करण्याचे, अपीलकर्त्यांना निदेशित करण्यात आले.

२. संबंधित घटनाक्रमांना आम्हाला थोडक्यात उद्धृत करता येईल. उत्तरवादी क्र. १ यास

---

1 रिट याचिका क्रमांक १८९५/२००७.

दिनांक १४ जून १९९१ रोजी अपीलकर्ता क्र. १- संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या अपीलकर्ता क्र. ३ शाळेत, शिपाई म्हणून नियुक्त करण्यात आले. त्याची विषयांकित पदावरील नियुक्ती दिनांक २९ जानेवारी १९९८ च्या पत्राअन्वये मंजूर करण्यात आली. विषयांकित पदावर काम करीत असताना, सन २००४ मध्ये, उत्तरवादी क्र. १ ने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून बॅचलर ऑफ आर्ट्स परीक्षा उत्तीर्ण केली. सन २००५ मध्ये, त्याने बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन परीक्षा उत्तीर्ण केली. दिनांक १० जून २००५ रोजी, उत्तरवादी क्र.२-महाराष्ट्र शासन ने राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/महाविद्यालये, डीएड महाविद्यालये व सैनिकी शाळा यांच्यामध्ये सुधारित शिक्षण सेवक योजना राबविण्याकरिता शासन निर्णय[2] जारी केला. शिक्षण सेवकाचा कार्यकाळ तीन वर्षे असा निश्चित करण्यात आला आणि परिच्छेद ८ मध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले:

> "८. जेथे, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांमधील शिक्षकेतर कर्मचारी हा, शिक्षकांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त करतो आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक /शाळा/महाविद्यालये यांमध्ये अशी पदे उपलब्ध असतात तेव्हा, अशा शिक्षकेतर सदस्याची शिक्षण सेवक म्हणून नेमणूक करावी लागेल,आणि तो शिक्षण सेवकास लागू असलेल्या मानधनास,

---

2 थोडक्यात ' शासन निर्णय '

हक्कदार राहील व इतर सर्व अटी व शर्ती त्याला लागू होतील. मात्र, शिक्षकेतर कर्मचाऱ्याची सेवा निवृत्तीवेतनासाठी विचारात घेण्यात येईल ”

३. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शिक्षकांच्या नियुक्तीची चौकट तयार करण्याची जबाबदारी राज्यांवर सोपविण्यात आली त्या केंद्र सरकारने सर्व शिक्षा अभियान (सर्वांसाठी शिक्षण अभियान) तयार केल्याच्या पार्श्वभूमीवर, दिनांक १५ फेब्रुवारी २००७ रोजी उत्तरवादी क्र. २-महाराष्ट्र राज्याने, एक नवीन शासन निर्णय जारी केला. या योजनेला विचारात घेऊन, उत्तरवादी क्र.२-राज्याने सर्व माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व महाविद्यालयातील शिक्षकांच्या रिक्त पदांवर शिक्षणसेवकांची नेमणूक करण्यासाठी पर्यायी योजना राबविणे अत्यावश्यक असल्याचे मानले. या योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ, दिनांक १३ ऑक्टोबर २००० च्या पहिल्या शासन निर्णयापासून सुरुवात करून त्यानंतर दिनांक २६ जुलै २००१, २७ जुलै २००१, १८ डिसेंबर २००३, २८ मे २००४, ०७ जानेवारी २००५, १० जानेवारी २००५ आणि २६ एप्रिल २००६ रोजीचे शासन निर्णय असे अनेक निर्णय, वेळोवेळी संमत करण्यात आले.

४. वरील सर्व शासन निर्णय एकत्र करण्यात आले आणि त्यांना दिनांक १३ ऑक्टोबर २००० रोजीच्या मूळ शासन निर्णयात समाविष्ट करण्यात आले, जे दिनांक १५ फेब्रुवारी २००७ च्या शासन निर्णयाद्वारे अद्ययावत करण्यात आले. शासन निर्णय अद्ययावत

केल्यानंतर, महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम[3], १९७७ दुरुस्त करण्यात आला आणि शिक्षण सेवक हे पद परिभाषा कलम अर्थात कलम २ (२४ अ) मध्ये समाविष्ट करण्यात आले व सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम १४ च्या अनुषंगाने, परिणामात्मक दुरुस्तींना समाविष्ट करण्यात आले. अधिनियम, १९७७ चे कलम ५ जे, एखाद्या खाजगी शाळेतील प्रत्येक कायमस्वरूपी रिक्त जागा, अशी रिक्त जागा, योग्यरीत्या अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून भरण्यास व्यवस्थापनाला बंधनकारक करते, त्यात सुद्धा खालील पद्धतीने दुरुस्ती करण्यात आली :

> "५. (१) व्यवस्थापन हे, शक्य तितक्या लवकर, खाजगी शाळेतील प्रत्येक कायमस्वरूपी रिक्त जागा अशी रिक्त जागा भरण्यास योग्यरीत्या अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून, विहित पध्दतीने भरेल.
>
> [परंतु असे कि असे रिक्त पद पदोन्नतीद्वारे भरले जात नाही तोपर्यंत व्यवस्थापनाने असे रिक्त पद भरण्यापूर्वी, शैक्षणिक निरीक्षक,महामुंबई , शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद किंवा, जसे प्रकरण असेल तसे, तांत्रिक, व्यावसायिक, कला किंवा विशेष शिक्षण देणाऱ्या शाळांच्या संदर्भात, संचालक किंवा संचालकाद्वारे पदनिर्देशित करण्यात आलेला अधिकारी याच्याकडून, त्याने ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तींच्या यादीत इतर शाळांमध्ये

---

3 थोडक्यात 'अधिनियम, १९७७ '

सामावून घेण्यासाठी योग्य व्यक्ती उपलब्ध आहे का, यासंबंधाने, पडताळणी करावी; आणि अशी व्यक्ती उपलब्ध असल्याच्या प्रसंगी, व्यवस्थापन त्या व्यक्तीची अशा रिक्त पदावर नियुक्ती करेल.]

(२) कायमस्वरूपी रिक्त पद भरण्यासाठी नियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती (शिक्षणसेवक वगळता) दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल. उपकलम (३) आणि (४) मधील तरतुदींच्या अधीन राहून, दोन वर्षांचा हा परिवीक्षा कालावधी पूर्ण झाल्यावर तो कायम करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[परंतु असे की, [शिक्षण सेवक)] म्हणून नियुक्त करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती तीन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल.]

[(२ ए) उपकलम (३) व (४) मधील तरतुदींच्या अधीन राहून, शिक्षण सेवक हा, तीन वर्षांचा परिवीक्षा कालावधी पूर्ण झाल्यावर, शिक्षक म्हणून नियुक्त तथा कायम करण्यात आल्याचे समजण्यात येईल.]

(३) व्यवस्थापनाच्या मते, एखाद्या परिवीक्षाधीन व्यक्तिचे काम किंवा वर्तन, त्याच्या परिवीक्षा कालावधीत, समाधानकारक नसल्यास, व्यवस्थापनाला, त्याला एक महिन्याची नोटीस [किंवा नोटीसच्या बदल्यात एक महिन्याचे वेतन

[किंवा मानधन] देऊन, त्या कालावधीत, कोणत्याही वेळी, त्याची सेवा समाप्त करता येईल.

(४) जर उपकलम (३) अन्वये कोणत्याही परिवीक्षाधीन व्यक्तीची सेवा संपुष्टात आणण्यात आली आणि त्याची सेवा संपुष्टात आणण्यात आली होती त्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत व्यवस्थापनाद्वारे त्याच शाळेत किंवा तिच्याशी संबंधित इतर कोणत्याही शाळेत त्याची पुनर्नियुक्ती करण्यात आली तर उपकलम (२) च्या प्रयोजनार्थ असलेल्या परिवीक्षेच्या आवश्यक कालावधीची गणना करताना त्याने यापूर्वी पूर्ण केलेला परिवीक्षा कालावधी, विचारात घेण्यात येईल.

[(४ ए) उपकलम (२), (३) किंवा (४) मधील कोणतीही गोष्ट, उपकलम (१) च्या परंतुकाअंतर्गत विहित करण्यात आल्याप्रमाणे, पदोन्नती किंवा सामावून घेणे यांद्वारे एखादे कायमस्वरूपी रिक्त पद भरण्यासाठी, नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस, लागू होणार नाही.]

(५) व्यवस्थापनाला, प्रत्येक तात्पुरते रिक्त पद, असे रिक्त पद भरण्यासाठी योग्यरीत्या अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून, भरता येईल. नियुक्तीचा आदेश, त्या संदर्भात विहित करण्यात आलेल्या नमुन्यात, तयार करण्यात

येईल, आणि तो, अशा व्यक्तीच्या नियुक्तीचा कालावधी, नमूद करेल."

५. उत्तरवादी क्र. १ चे प्रकरण असे आहे की, शिक्षण सेवक पदासाठी आवश्यक अर्हता प्राप्त केल्यानंतर, त्याने या पदावर नियुक्तीसाठी अपीलकर्ता क्र. १ ला अनेक निवेदने सादर केली, परंतु त्यांचा सकारात्मक विचार करण्यात आला नाही. सन २००६ मध्ये शाळेत शारीरिक शिक्षण शिक्षक म्हणून कार्यरत असलेले श्री. बी. आर. ढाकणे हे सेवानिवृत्तीचे वय पूर्ण झाल्यावर निवृत्त होणार होते. अपीलकर्ता क्र. १ हे, शिक्षण सेवक पदाच्या नियुक्तीसाठी अर्ज मागवित एक जाहिरात, 'लोकमान' या दैनिक वृत्तपत्रात प्रकाशित अशी, दिनांक १ जून २००८ रोजी जारी केलेली असल्याचा दावा करतात. अपिलकर्ते असा दावा करतांत की, उत्तरवादी क्र. १ ला, सदरील रिक्त पद आणि शिक्षण सेवक पदावरील नियुक्तीसाठी रिक्त पद भरण्यासाठी जारी करण्यात आलेली जाहिरात, यांच्याबाबत, जाणीव होती, तरी, त्याने आपला अर्ज सादर केला नाही. त्याऐवजी, अपीलकर्त्यांद्वारे हे पद भरण्यात आल्यानंतर, त्याने उच्च न्यायालयात रिट याचिका[4] दाखल करून, उत्तरवादी क्र. ५ च्या नियुक्तीला आव्हान दिले. उत्तरवादी क्र. १ ने स्वतंत्रपणे लातूरच्या शालेय न्यायाधिकरणाकडे अपील[5] दाखल केले, ज्यांस अभियोगाअभावी, फेटाळण्यात आले होते. दिनांक ३१ जानेवारी २००७ रोजी, उत्तरवादी क्र. १ ने, रिट याचिका दाखल करून उच्च

---

4 रिट याचिका क्रमांक १८९५/२००७.

5 अपील क्रमांक १३१/२००६.

न्यायालयाकडे धाव घेतली ज्यास आक्षेपित न्यायनिर्णयाच्या स्वरुपात, त्याच्या हितामध्ये निर्णित करण्यात आलेले आहे.

६. अपिलकर्त्यांचे विद्वान वकील श्री. आदर्शकुमार पांडे सादर करतात की, उच्च न्यायालयाने उत्तरवादी क्र. १ द्वारे दाखल करण्यात आलेली रिट याचिका मान्य करण्यात, या कारणास्तव, चूक केलेली आहे की, उत्तरवादी क्र. १ ला शिपाई (शिक्षकेतर कर्मचारी) पदावरून शिक्षण सेवक पदावर, जे एक शिक्षकी पद आहे, पदोन्नती देण्यात आली होती, जी बाब, अधिनियम आणि नियमांच्या तरतुदींच्या उल्लंघनातील आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेण्यात उच्च न्यायालय अपयशी ठरले. या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, ते, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी नियम, १९८१ च्या अनुसूची 'एफ' च्या खंड ३ वर भिस्त ठेवण्याचा प्रयत्न करतात, जो खंड, शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करतो आणि कनिष्ठ श्रेणी कर्मचाऱ्यांची त्यांच्या नियुक्तीच्या तारखेच्या आधारे समान सेवाज्येष्ठता यादी ठेवण्याचे दायित्व संबंधित शाळेवर टाकतो आणि पुढे असे बंधनकारक करतो की, कनिष्ठ श्रेणी कर्मचारी वर्गापैकी कुणीही जर प्रयोगशाळा सहाय्यक किंवा लिपिक या पदासाठी विहित करण्यात आल्याप्रमाणे त्याच्या अर्हतेत सुधारणा करतो तर, सदरील कर्मचाऱ्याला, सेवाज्येष्ठतेच्या सामाईक यादीतील त्याच्या अनुक्रमांकानुसार, संबंधित पद भरून, प्राधान्य देण्यात येणे आवश्यक आहे. अपिलकर्त्यांचे विद्वान वकील सादर करतात की, उत्तरवादी क्र. १ हा शिपाई पदावर

कार्यरत होता, आणि खूपच झाले तर, सेवाज्येष्ठता यादीतील त्याच्या अनुक्रमांकानुसार, त्याला प्रयोगशाळा सहाय्यक किंवा लिपिक या पदावर, परंतु जे शिक्षकी कर्मचारी संवर्गाअंतर्गत होते अशा शिक्षण सेवक पदाचा समावेश असलेल्या इतर कोणत्याही पदावर नाही, पदोन्नत करता आले असते. अशा प्रकारे त्यांनी सादर केले की, उत्तरवादी क्र. १ हा, जे, शिक्षक श्रेणीचा एक भाग असलेले व पदोन्नती-नसलेले एक पद आहे अशा शिक्षण सेवक पदाकरिताच्या पदोन्नतीकरिता हक्कदार नव्हता.

७. या विपरीत, उत्तरवादी क्र. १ चे विद्वान वकील श्री. विवेक सी. सोळशे हे आक्षेपित न्यायनिर्णयाचे समर्थन करतात आणि सादर करतांत की, शिक्षण सेवक या पदाचा अधिनियमात समावेश करीत शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई किंवा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाद्वारे पदावर सामावून घेण्यासाठी ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तींच्या यादीमधील योग्य व्यक्तीची नेमणूक करून हे पद भरण्याचे दायित्व खाजगी शाळांच्या व्यवस्थापनावर टाकीत, महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मध्ये दुरुस्ती केल्यामुळे, संपूर्ण विवाद मिटविण्यात आलेला आहे.

८. आम्ही पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले आहे,अभिलेख तसेच आक्षेपित न्यायनिर्णय पडताळणी केली आहे. आमच्या मते, शिक्षकेतर संवर्गातून शिक्षक संवर्गात नियुक्तीसाठी उत्तरवादी क्र. १ चा अधिकार नसण्याच्या संबंधाने अपिलकर्त्यांचे विद्वान वकील यांनी मांडलेल्या युक्तिवादांना उच्च न्यायालयाद्वारे योग्य त -हेने विचारात घेण्यात

आलेले आहे आणि त्यांना वैध कारणास्तव अग्राह्य धरण्यात आलेले आहे.

९. ही बाब विवादित नाही की, उत्तरवादी क्र. १ जो, शिपाई पदावर कार्यरत होता, त्याने पुढील शिक्षण घेण्यासाठी व आपली अर्हता सुधारण्यासाठी अपीलकर्ते-व्यवस्थापन यांच्याकडून परवानगी घेतलेली होती. ही बाब सुद्धा विवादित नाही की, आपल्या सेवेदरम्यान त्याने मिळविलेल्या अर्हतेच्या दृष्टीने उत्तरवादी क्र. १ हा, शिक्षण सेवक पदावरील नियुक्ती करण्यात यावयास अर्हताप्राप्त झाला. तिसरी गोष्ट म्हणजे, आवश्यक अर्हता पूर्ण झाल्यावर, उत्तरवादी क्र. १ ने रिक्त जागा जेव्हा केव्हा निर्माण होईल तेव्हा विषयांकित पदावर नेमणूक करण्यात यावी यासाठी अपीलकर्ते-व्यवस्थापनाला निवेदन सादर केलेले होते.

१०. उपरोक्त स्थिती असूनही, सन २००६ मध्ये श्री. ढाकणे, यांच्या सेवानिवृत्तीनंतर शिक्षण निरीक्षक. शिक्षण अधिकारी/ जिल्हा परिषद यथास्थिती, यांच्याकडे जाण्याऐवजी, शिक्षण संचालकांनी नियुक्त केलेले कार्यालय असल्याने, त्या कार्यालयात ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तीच्या यादीत उपलब्ध असलेल्या योग्य व्यक्तीद्वारे भरावयाच्या पदांसाठी , अपीलकर्त्यांनी, विषयांकित पदे भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनतेकडून अर्ज माजवणारी जाहिरात जारी करणे सुरु केले, आणि त्याद्वारे विषयांकित पदावर नियुक्ती करण्याबाबत उत्तरवादी क्रमांक १ च्या दाव्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. आक्षेपित न्यायनिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये उच्च न्यायालयाच्या निरीक्षणास आले कि दैनिक

वृत्तपत्रात जाहीर नोटीस जारी करण्याचा पैलू देखील संशयास्पद आहे कारण अपीलकर्त्यांनी त्यांच्या प्रति - प्रतिज्ञापत्रासह दैनिक वृत्रपत्राचे संबंधित पान सादर केले नाही, आणि जे सादर करण्यात आले होते त्यांस, विश्वसनीय वृत्तपत्र मानणे शक्य नव्हते. शिवाय, उत्तरवादी क्र. १ द्वारे विषयांकित पदावरील नियुक्तीसाठी सादर करण्यांत आलेल्या अर्जाला अपिलकर्त्यांद्वारे विवादित करण्यात आलेले नाही. त्यांचा एकच युक्तिवाद आहे की, उत्तरवादी क्र. १ हा शिक्षण सेवक म्हणून नियुक्त करण्यात यावयास अर्हताप्राप्त नव्हता आणि असे की, अपीलकर्ते हे, जारी करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने, पद भरण्यास, योग्यरित्या हक्कदार होते.

११. एकदा उत्तरवादी क्र.१ ने उत्तरवादी क्र. ३-शाळेतील आपल्या सेवेदरम्यान आवश्यक अर्हता प्राप्त केल्यानंतर आणि अखेरीस महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ यामध्ये समाविष्ट करण्यात आला होता, त्या संबंधित शासन निर्णयाने शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्याची आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याच्या अधीन राहून शिक्षण सेवक म्हणून, आणि पुढे, असे पद उपलब्ध असण्याच्या अधीन, नेमणूक करण्यास परवानगी दिली, तेव्हा, उत्तरवादी क्र. १ हा शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा एक भाग असल्याने, विषयांकित पदावर नियुक्तीसाठी त्याला विचारात घेण्यात यावयास तो हक्कदार नाही, असे अपीलकर्त्यांनी नमूद करणे हे ऐकून घेणे शक्य नाही. किंबहुना, दिनांक १०.०६.२००५ च्या विनियमामध्ये वापरण्यात आलेली भाषा ही स्वतःहून

असे स्पष्ट करते की, शिक्षण सेवक पदावर नियुक्ती करवून घेण्यासाठी निवेदन देऊन कोणतीही पावले उचलण्याची कर्मचाऱ्यांना आवश्यकता नाही आणि अपिलकर्त्यांवर असे दायित्व टाकण्यात आले होते की, शिक्षण सेवक या पदावर कायमस्वरूपी रिक्त पद उपलब्ध असताना, अशा पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता ज्याने प्राप्त केली असती अशा शिक्षकेतर कर्मचारी वर्गाच्या सदस्याची थेट नियुक्ती करण्यात यावयाचे सुनिश्चित करण्याचे अपीलकर्त्यांवर दायित्व टाकण्यात आले.

१२. वरील चर्चा लक्षात घेता, आम्ही या मताचे आहोत की, आक्षेपित न्यायनिर्णय हा योग्यरीत्या तर्कसंगत आहे आणि तो कोणताही हस्तक्षेप होण्यास योग्य नाही.

१३. दिलासाची रचना करण्याचा पैलू विचारात घेऊया. अपिलकर्त्यांनी, या अपिलात, खाजगी उत्तरवादी क्र. ४ व ५ यांना, ते आवश्यक व योग्य पक्षकार असल्याने, योग्यरीत्या सामिल केलेले आहे तरीसुद्धा, त्यांनी उपस्थिती दिलेली नाही. उत्तरवादी क्र. ५ ला, अपीलकर्त्यांद्वारे जारी करण्यात आलेल्या दिनांक २४ ऑगस्ट २००९ च्या पत्रानुसार, शिक्षण सेवक पदासाठी नियुक्ती पत्र जारी करण्यात आले होते. त्याने, इतर बाबींसोबत, असे नमूद करीत एक संमतीपत्र/हमीपत्र निष्पादित केलेले होते की, उत्तरवादी क्र. १ आपल्या रिट याचिकेत जर यशस्वी होतो, अशा प्रसंगी, तो विषयांकित पदावर कोणत्याही हक्काचा दावा करणार नाही. याव्यतिरिक्त, अपीलकर्ता क्र. १ आणि अपीलकर्ता क्र. ३-शाळा यांच्या वतीने अपीलकर्ता क्र. १ च्या सचिवाने एक संमती पत्र देखील, इतर बाबींसोबत, असे नमूद

करीत निष्पादित केले होते की, उत्तरवादी क्र.१ द्वारे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेतील न्यायनिर्णय हा संस्थेच्या विरोधात गेला तर, संपूर्ण जबाबदारी ही संस्थेची राहील. उत्तरवादी क्र. ३-शिक्षणाधिकारी याने सुद्धा, शिक्षण सेवक पदावरील उत्तरवादी क्र. ५ च्या नियुक्तीला, उत्तरवादी क्र. १ द्वारे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेच्या निकालाच्या अधीन राहून, मान्य केलेले होते.

१४. अभिलेख असे दर्शवितात की, प्रस्तुतच्या अपिलात दिनांक १८ डिसेंबर २००९ रोजी नोटीस जारी करतांना, आक्षेपित न्यायनिर्णयाचे प्रचालन, स्थगित करण्यात आले होते. परिणामांती, उत्तरवादी क्र. ५ ने, उत्तरवादी क्र. ३-शाळेत, शारीरिक शिक्षण शिक्षक म्हणून, सहाय्यक शिक्षक पदावर आपले कर्तव्य पार पाडणे सुरु ठेवलेले आहे. वर निदर्शनात आल्याप्रमाणे, उत्तरवादी क्र. ५ ला, प्रस्तुतच्या अपिलात योग्यप्रकारे बजावणी करण्यात आली होती, परंतु त्याने, कार्यवाहीत उपस्थित न राहणे किंवा त्यांत भाग न घेणे याकरिता, पसंती दिलेली आहे. आक्षेपित न्यायनिर्णय आता या न्यायालयाद्वारे कायम करण्यात आला आणि उत्तरवादी क्र. १ यांस, दिनांक ०१ जानेवारी २०१० पासून प्रभावी असे शिक्षण सेवक या पदावरील, आणि त्या तारखेपांसून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, सहाय्यक शिक्षक पदावरील, नियुक्तीकरिता तो हक्कदार असल्याचे ठरविण्यात आलेले आहे, तेव्हा, या न्यायालयाला, समन्यायांचा समतोल साधण्यासंबंधाने विचार करणे आवश्यक आहे. आम्हाला कळविण्यात आले आहे की, आतापर्यंतच्या सर्व वर्षांमध्ये, उत्तरवादी क्र. १ हा

अपीलकर्ता क्र. ३-शाळेत शिपाई पदावर कार्यरत राहिलेला आहे. उत्तरवादी क्र.१ चे विद्वान वकील हे असे नमूद करतात की, आक्षेपित न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शिक्षण सेवक पदावरील नियुक्तीपासून त्याला वंचित ठेवण्यामुळे झालेला आर्थिक परिणाम हा अंदाजे रु. २१,००,०००/- (रु. एकवीस लाख) इतका होतो, परंतु आमचे असे मत आहे की, त्याला झालेल्या आर्थिक नुकसानीखातर व विषयांकित पदावर त्याची नियुक्ती न होणे या करिता, उत्तरवादी क्र. १ ला, रु. १०,००,०००/- (रु. दहा लाख) एकत्रित रक्कम देण्याचे अपीलकर्त्यांना निदेशित करण्यात आले तर, न्यायाची उद्दिष्टे साध्य होतील. त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही आठ आठवड्यांच्या आत पूर्ण करण्यात येईल. सेवाज्येष्ठता व सेवानिवृत्ती याचे लाभ मिळविण्याच्या प्रयोजनार्थ, शिक्षण सेवक पदावरील त्याच्या नियुक्तीची प्रतिकात्मक तारीख ही दिनांक ०१ जानेवारी २०१० अशी समजण्यात येईल. उत्तरवादी क्र. ३ हे, दिनांक ०१ जानेवारी २०१० पासून शिक्षण सेवक पदावरील आणि दिनांक ०१ जानेवारी २०१३ पासून सहाय्यक शिक्षक पदावरील, त्यासंबंधाने प्रतिकात्मकरीत्या मोजणी करून, उत्तरवादी क्र. १ ची वेतनश्रेणी दर्शविणारे पत्र, जारी करतील आणि त्याची एक प्रत तीन महिन्यांच्या आत अपीलकर्त्यांना देतील.

१५. उत्तरवादी क्र. ५ च्या संबंधाने, असे निदेशित करण्यात येते की, अपीलकर्ता क्र. १-संस्थेद्वारे चालविल्या जात असलेल्या कोणत्याही शाळेत / महाविद्यालयात शारीरिक शिक्षण शिक्षकाचे पद रिक्त आहे आणि उपलब्ध आहे, अशा प्रसंगी, त्याला तेथे सहाय्यक शिक्षक

पदावर योग्य प्रकारे सामावून घेण्यात येईल. पर्यायाने, उत्तरवादी क्र. ५ यास तो एक अतिरिक्त शिक्षक आहे असे घोषित करण्यात आल्यानंतर, वेळोवेळी दुरुस्त करण्यात आलेल्या, १९७७ च्या अधिनियमाच्या विनियम ५ च्या अनुषंगाने, राज्य प्राधिकारणांद्वारे नियुक्तीसाठी, विचारात घेण्यात येईल. तथापि, उत्तरवादी क्र. ५ कडून, ज्या कालावधीत त्याने अपीलकर्ता क्र. ३ - शाळेत सेवा दिलेली आहे त्या कालावधीसाठीच्या वेतन किंवा भत्ते यांची कोणतीही वसुली तेथे करण्यात येणार नाही.

१६. पक्षकारांनी स्वत:चा खर्च स्वतः उचलावा अशी तरतूद करीत, वरील शर्तींवर अपील निकाली काढण्यात आले आहे.

मुख्य नोंदी तयार केल्या : अंकित ग्यान प्रकरणाचा निकाल :अपील निकाली काढण्यात आले.

-: अस्वीकरण :-

या न्यायनिर्णयाचा मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

- x-x-x-x -